# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अंन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.११३५ /२३ /त.क्र.४६ /२६/०१**

श्री.जीवन भोसले

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कामगार अधिकारी (शहर)
बृ.मुं.म.पा. कामगार विभाग यांचे कार्यालय,
प्रमुख कामगार अधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मुख्यालय,
६ वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कामगार अधिकारी
बृ.मुं.म.पा. कामगार विभाग यांचे कार्यालय,
प्रमुख कामगार अधिकारी यांचे कार्यालय, महापालिका मुख्यालय,
६ वा मजला, विस्तारीत इमारत, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०२.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित (ऑनलाईन) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

तक्रारदार श्री.जीवन भोसले यांनी अपील क्रमांक १४१३/२२/०१ यात दिनांक १६.०२.२०२३ रोजी पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचे तसेच याप्रकरणी दोन दिवसात चौकशी करण्याची मागणी करत तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक १६.०२.२०२३ रोजीच्या आदेशाचे अवलोकन केले असता यात जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कामगार अधिकारी (शहर) बृहन्मुंबई महानगरपालिका, कामगार विभाग यांना असे निर्देशित करण्यात आले होते की, दहा दिवसात प्रशासकीय अधिकारी घनकचरा व्यवस्थापन यांना दिनांक २५.१०.२००७ च्या परिपत्रकासंदर्भात पत्रव्यवहार करावा. या संदर्भात दिनांक ०१.०६.२०२३ रोजी झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती तसेच आदेशात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थिनी त्यांच्या मूळ जोडपत्रामध्ये नमूद केलेल्या व्यक्तींना नोकरी देण्यासंदर्भात नियमानुसार प्रतिसाद दिला असल्याचे यात सूचित केलेले आहे. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०२.२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**